MHAK070005152026

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८६/२०२६

नि.क्र.१ वरील आदेश

१. **मुश्ताक हुसैन अमजद हुसैन,**

२. **शब्बीर हुसैन अमजद हुसैन** **---- अर्जदार**

**- विरुध्द -**

**कोणीही नाही.** **---- गैरअर्जदार**

**निशाणी १ खालील आदेश**
**(दिनांक ०१.०८.२०२६)**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराच्या अभिकथनाप्रमाणे अर्जदाराचे वडील **अमजद हुसेन मोहम्मद अशरफ** यांचे दिनांक ०२.०२.१९९६ रोजी बडा मोमीनपुरा, ता. बाळापूर, जि. अकोला आणि अर्जदाराची आई **ताहेरा बी अमजद हुसेन** यांचे दिनांक १५.१०.२०२१ रोजी बडा मोमीनपुरा, ता. बाळापूर, जि. अकोला येथे निधन झाले असून अर्जदार हे त्यांचे वारस आहेत. यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

३. अमजद हुसेन मोहम्मद अशरफ व ताहेरा बी अमजद हुसेन यांचे मृत्युपश्चात अर्जदार यांना मयतांच्या नावाने मिळणारे शासकिय व निमशासकिय लाभाकरीता वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारांतर्फे विधीज्ञ **मो. मुद्दस्सीर** यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत अर्जाचे निर्गतीकरीता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाल्यामुळे त्यांच्या कारणामीमांसेसह त्याचे उत्तर खालीलप्रमाणे नमुद करत आहे.

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत का ? | **होकारार्थी.** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ व २ बाबत –**

**५.** अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्ठी देण्यासाठी खालील कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

| अ. क्र. | कागद | निशाणी क्र. |
|---|---|---|
| ०१ | मयत अमजद हुसेन मोहम्मद अशरफ यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची व्हेरीफाईड प्रत | **नि.क्र.११** |
| ०२ | मयत ताहेरा बी अमजद हुसेन उमर यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची व्हेरीफाईड प्रत | **नि.क्र.१०** |
| ०३ | अर्जदार क्र. १ व २ यांच्या आधार कार्डांच्या व्हेरीफाईड प्रती | **नि.क्र.१२ व १३** |

**६.** अर्जदाराच्या मागणीप्रमाणे दिनांक ३१.०३.२०२६ रोजी दैनिक "अकोला दर्शन" आवृत्ती मधील जाहिर नोटीस **(नि.क्र.१४)** काढण्यात आली. या न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आलेला जाहिरनामा **(नि.क्र.६)** या जाहिरनाम्याच्या व जाहिर नोटीसीच्या प्रसिध्दीनंतर देखील अर्जदार हे मयत अमजद हुसेन मोहम्मद अशरफ व मयत ताहेरा बी अमजद हुसेन उमर यांचे वारस नाहीत, अशी तक्रार कुणीही आजतागायत उपस्थित केलेली नाही.

**७.** अर्जदार क्र.१ यांनी याकामी आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **(नि.क्र.७)** दाखल केलेले आहे. सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा अर्जातील कथने व दाखल कागदपत्रे यांचेशी पूर्णपणे सुसंगत आहे. थोडक्यात, अर्जदार यांच्या या अर्जातील कथनांना कोणीही आव्हानीत केलेले नाही. अर्जदार हे मयत अमजद हुसेन मोहम्मद अशरफ व मयत ताहेरा बी अमजद हुसेन उमर यांचे वारस असल्याचे दिसून येत आहे. अर्जदार क्र.१ व २ हे मुलगा या नात्याने वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे

उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ व २ हे मयत **अमजद हुसेन मोहम्मद अशरफ** व मयत **ताहेरा बी अमजद हुसेन उमर** यांचे वारस आहेत असा वारस दाखला (Heirship Certificate) त्यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यावर प्रदान करणेत यावा.

३. अर्जदारांनी सिव्हील मॅन्युअल परिच्छेद ३१२ च्या तरतुदीप्रमाणे मयत अमजद हुसेन मोहम्मद अशरफ व मयत ताहेरा बी अमजद हुसेन उमर यांचे नावावरील सर्व मालमत्तांची यादी दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत)

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.08.01 14:51:30 +0530

**दिनांक– ०१.०८.२०२६**

**(डी. एम. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,**
**बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | ०१/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | ०१/०८/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०१/०८/२०२६ |